| | | |
|---|---|---|
| १) **कामाचे स्वरुप** | : | **नैसर्गिक आपत्ती दरम्यान तात्काळ मदत** |
| २) **पोलीस ठाणे** | : | **नाटे , जिल्हा रत्नागिरी** |
| ३) **कामाचा दिनांक** | : | **दिनांक २८-०३-०१७ रोजी २०.३० वा.** |
| ४) **थोडक्यात माहिती** | : | |

दिनांक २८/०३/२०१७ रोजी रात्रो २०.३० वा. हि घटना घडली अभियांत्रीकी महाविदयालयात शिकणारे रत्नागिरीतील विलणकर , चव्हाण, गोखले ,सातुर्डेकर फिरण्यासाठी व मौजमजेसाठी वेत्ये समुद्र किनारी गेले होते, सायंकाळी १७.०० ते १७.३० वा समुद्राला तशी ओहोटीच होती त्यावेळी समुद्रकिनारा त्यांना रिकामाच मिळाला त्या जोषात ते समुद्र किनारी असणाऱ्या रिकाम्या खडकावर जावून वसले. त्या ठिकाणी ते स्वतःच्या विश्वात येवढे रममान झाले की त्यांना समद्राच्या पाण्याला भरती येवुन चारही बाजुंनी पाणी वाढलेले आहे हे त्यांच्या लक्षातच आले नाही. अशा तऱ्हेने पाणी वाढु लागल्याने व उत्साह जीवावर बेततोय हे लक्षात आल्यावर त्यांनी जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष,रत्नागिरी येथे दुरध्वनी वरुन आम्ही एका खडकावर पाण्यामध्ये अडकलेलो असून चारही बाजुनी पाण्याने घेरलेलो आहोत आम्हाला मदत करा असे सांगीतले .

नाटे पोलीस ठाणे यांना दुरध्वनी वरुन माहिती कळताच तत्परता दाखवुन नाटे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी यांनी काही स्थानिकांना घेवुन एका नौकेसह वेत्ये समद्रामध्ये तरुणांच्या शोधमोहिमेवर रवाना झाले. उसळत्या लाटांवर स्वार होत मोठया धाडसाने नाटे पोलीस ठाणेच्या प्रभारी अधिकारी व कर्मचारी यांच्या टिमने स्थानिकांच्या मदतीने काळोखात त्या तरुणांचा शोध घेवुन त्यांचा जीव वाचवला.

५) **फोटो** :



# उत्साह नडला अन् चौघांना लाटांनी घेरले

## वेत्ये समुद्रातील घटना : नाटे पोलिसांनी दिले जीवदान

**राजेश शेळके** : सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. २८ : '...हॅलो ...हॅलो ...हॅलो साहेब, आम्ही वेत्ये समुद्रात अडकलो आहोत. आमचा जीव धोक्यात आहे. आम्हाला वाचवा', असा मदतीचा दूरध्वनी पोलिस नियंत्रण कक्षात आला आणि पोलिस यंत्रणा हलली.

राजापूर तालुक्यातील वेत्ये समुद्रकिनारी फिरायला गेलेल्या चार तरुणांना अतिउत्साह चांगलाच नडला. ज्या खडकावर ते बसले होते, त्याच्या चारी बाजूंनी समुद्राच्या भरतीच्या पाण्याने घेरले आणि त्यांची पाचावर धारण बसली. नाटे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रकाश धेंडे त्यांच्या पथकासह तेथे पोचले. त्यांनी पाडव्याच्या पूर्वसंध्येला चौघांना जीवदान दिले.

राजापूर तालुक्यातील वेत्ये किनाऱ्यावर सोमवारी (ता. २७) रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकणारे रत्नागिरीतील विवलकर, चव्हाण, गोखले, सातुर्डेकर फिरण्यासाठी आणि मौजमजेसाठी वेत्ये किनारी गेले होते. सायंकाळी पाच, साडेपाचला तशी ओहोटीच होती. त्यामुळे अथांग समुद्रकिनारा त्यांना रिकामाच मिळाला. तरुणांच्या उत्साहाला पारावर उरला नाही. त्या जोषात ते ओहोटीमुळे रिकाम्या

पान ८ वर »

**पालकांकडून आभार**

**मुले समुद्रात अडकल्याचे वृत्त पालकांपर्यंत पोचले होते. त्यामुळे पालकही हवालदिल होते. मुलांना पोलिसांनी वाचवल्याचे समजल्यानंतर नाटे पोलिसांच्या कामगिरीमुळे पालक सद्‌गदित झाले. मुले सुखरूप असल्याचे पाहून त्यांना एकच आनंद झाला. त्यांनी पोलिसांसह स्थानिकांचेही आभार मानले आणि पेढेही दिले.**

### उत्साह नडला अन् चौघांना लाटांनी घेरले

» पान १ वरून

झालेल्या एका खडकावर जाऊन बसले. त्यांच्याच विश्वात ते एवढे रमले होते, धुंद झाले होते की समुद्राला भरती येऊन चारही बाजूंनी पाणी वाढते आहे, हे लक्षातच आले नाही. रात्रीचे साडेआठ वाजले होते. वेळ हातातून सुटत होती. पाण्याने ते घेरले जाऊ लागले. पायापासून पाणी वर येऊ लागले, तेव्हा खडकावर असूनही त्यांच्या पायाखालची वाळू सरकली.

आपला उत्साह जीवावर बेततोय हे लक्षात आल्यावर भीतीने गाळण उडाली; मात्र तेवढ्यातही त्यांनी मोबाइलवरून जिल्हा पोलिस नियंत्रण कक्षात फोन लावला. 'साहेब, आमचा जीव धोक्यात आहे. आम्ही वेत्ये समुद्रकिनारी अडकलो आहोत. पाण्याने घेरले आहोत. आम्हाला मदत करा.' अशी आर्जवे केली. पोलिसांनी तत्परता दाखवून नाटे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रकाश धेंडे यांना फोन केला. त्यांनी सहकारी महेश मिलके, सागर जाधव, होमगार्ड नितीन हळदणकर यांना घेतले. एका नौकेसह स्थानिक राजू जाधव यांच्यासह काहींना घेतले आणि ते शोधमोहिमेवर निघाले. रात्रीची वेळ असल्याने काळोखात त्यांना शोधण्यात काही वेळ गेला; परंतु तरुणाच्या मोबाइलच्या बॅटरीवर त्यांचा माग लागला. पोलिसांची टीम उसळत्या लाटांवर स्वार झाली. मोठ्या धाडसाने खडकाजवळ जाऊन चौघांनाही नौकेत घेतले.